अकोला महानगरपालिका, अकोला

(कार्यालयीन टिप्पणी) बाजार विभाग

| दिनांक | |
|---|---|
| 20/2/010 | कार्यालयाचे नाव:- बाजार विभाग |

विषय:- कागदीपुरा, गौतमबुध्द मार्ग, अशोक नगर मधील म.न.पा व्यापारी संकुलातील दुकानदाराकडून करारनामा करणे व अलॉटमेंट लेटर देण्याबाबत.

महोदय,

अकोला महानगरपालिका हद्दीतील नझुल प्लॉट क्र. के ४२ शिट क्र. ३४ डी येथील कागदीपुरा गौतमबुध्द मार्ग, अशोक नगर भागात व्यापारी संकुल उभारण्याचे कंत्राट महानगरपालिका अकोलाने श्री. सैय्यद जहूर सैय्यद रियाज रा. अकोला या विकासकाला दिले होते. त्यांनी बांधलेल्या व्यापारी संकुलामध्ये तळमजल्यावर एकंदरीत १६ दुकाने असुन या संपुर्ण व्यापारी संकुलाची मालकी अकोला महानगरपालिकेची आहे.

[illegible] व्यापारी संकुल उभारते वेळी विकासक श्री. सैय्यद जहुर सैय्यद रियाज [illegible] महानगरपालिका अकोला यांच्यात झालेल्या करारानुसार विकास[illegible] केलेल्या [illegible] महानगरपालिका अकोलाने आवश्यक ते परवाना शुल्क आकारुन निश्चित अटी व शर्तीवर सदरील दुकाने निश्चित कालावधी करीता वापरावयास देण्याचे ठरले आहे.

विकासक श्री. सैय्यद जहूर सैय्यद रियाज रा. अकोला यांनी केलेल्या शिफारसी नुसार श्री. मुश्ताक अ. सैय्यद छोटू कुरेशी ---- ला सदरील व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील गाळा क्र. १६ ---वापरण्याचा परवाना सोबत जोडलेल्या करारनाम्यातील शर्ती व अटीवर मंजुरी देण्यास हरकत नाही. सोबत अर्जदाराचा अर्ज विकासकाने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व करारनाम्यांची प्रत सोबत जोडली आहे.

करारनाम्यातील अटीनुसार करारनामा केल्यानंतर अलॉटमेंट देण्यास मंजुरी द्यावी ही विनंती.

आदेशार्थ सविनय सादर.

[signature]

वसुली लिपीक

प्र. बाजार अधिक्षक
महानगरपालिका, अकोला

[signature] 12/6/07

मा. उपआयुक्त (प्र) [signature] 12/6/010

(2)

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

AC 203632

# करारनामा

पक्ष क्र. १ :- अकोला महानगरपालिका तर्फे

आयुक्त म.न.पा. अकोला.

पक्ष क्र. १ :- श्री. ...................................................

...................................................

अकोला महानगरपालिका हद्दीतील नझुल शिट नं. ३४ D प्लॉट नं. ४२ कागदीपुरा, गौतमबुध्द रोड, अशोक नगर अकोला येथे व्यापारी संकुल उभारण्याचे कंत्राट तत्कालीन नगरपरिषदेने सैय्यद झअुर रियास या विकासकाला दिले होते.

त्यांनी बांधलेल्या व्यापारी संकुलामध्ये एकंदरीत ---------------------- गाळे असुन त्या संपुर्ण व्यापारी संकुलाची मालकी अकोला महानगरपालिकेची आहे.

सदरील व्यापारी संकुलाची उभारणे करण्याचे कंत्राट विकासक सैय्यद झअुर सैय्यद रियाझ यांना दिनांक १०.१.२००१ रोजी देण्याचे निश्चित करण्यात आले.

Scanned with CamScanner

विकासक सैय्यद झमुर सैय्यद रियाझ नगरपरिषद अकोला यांच्यात झालेल्या दि.२५।०३।०१ च्या करार नाम्यानुसार, विकासकाने शिफारस केलेल्या व्यापाऱ्यांना किंवा व्यक्तींना, सदरील व्यापारी संकुलातील गाळे, नगरपरिषदेने आवश्यक ते परवाना शुल्क आकारून निश्चित अटी व शर्तीवर सदरील गाळे निश्चित कालावधीकरीता वापरावयास द्यावयाचे ठरले आहे.

विकासक सैय्यद झअुर रियाझ यांनी केलेल्या शिफारशीनुसार पार्टी नं. २ ला सदरील व्यापारी संकुलातील गाळा क्र. ...२९...... वापरण्याचा परवाना अकोला म.न.पा. ने काही अटी व शर्तीवर मंजुर केला आहे. त्या खालील प्रमाणे आहेत.

१) सदरील व्यापारी संकुलातील गाळा क्र. ....२९..... वापरण्याचा परवाना अकोला म.न.पा. पक्ष क्र. १ ने पक्ष क्र. २ ला तीस वर्षाच्या मुदतीकरीता मंजुर केला आहे.

२) सदरील व्यापारी संकुलातील दुकानाचा परवाना देण्याचा अधिकार अकोला म.न.पा. ला असुन परवाना धारक पार्टी नं. २ त्यांचे प्रतिनिधी किंवा वारसांना परवाना शुल्क अदा करून दुकानाचा वापर निश्चित केलेल्या कालावधी पर्यंत करता येईल.

३) पक्ष क्र. २ ला मंजुर करण्यात आलेल्या गाळ्याचे क्षेत्रफळ ........९०........चौरस फुटाचे असून पक्ष क्र. २ ने पक्ष क्र. १ ला २ रू. प्रती चौरस फुटाप्रमाणे, गाळ्याच्या संपुर्ण क्षेत्रफळाइतके परवाना शुल्क पक्ष क्र. १ ला प्रतिमाह अदा करावे लागेल.

४) पक्ष क्र. २ ने पक्ष क्र. १ म.न.पा. चा कर तसेच लागु असलेले इतर सर्व कर देणे. या करारनाम्यानुसार बंधनकारक राहील.

५) विकासक आणि पक्ष क्र. १ यांच्यातील करारानुसार पक्ष क्र. २ ला सुरूवातीचे एक वर्ष पर्यंत परवाना शुल्क भरावे लागणार नाही. परंतु म.न.पा. चे सर्व कर गोळा ताब्यात आल्यापासून कराराच्या कालावधी संपेपर्यंत देणे बंधनकारक राहील.

६) संपूर्ण कराराच्या एकुण ३० वर्षाच्या कालावधीत प्रत्येक ५ वर्षांनी परवाना शुल्क १०% वाढविण्याचे अधिकार पक्ष क्र. १ ला असेल,व आणि तो पक्ष क्र. २ वर बंधनकारक राहील.

७) कराराचा एकूण ३० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, नुतनीकरण करण्याचे तसेच बदलत्या परिस्थितीनुसार परवाना शुल्क वाढविण्याचा अधिकार पक्ष क्र. १ ला पुर्णपणे राहील, असे या करारनाम्यानुसार ठरले आहे.

८) सदरील व्यापारी संकुलातील गाळा पक्ष क्र. १ ला दिनांक २५।०७।०२ रोजी सोपविण्यात आला. त्या तारखेपासून परवाना कालावधी ३० वर्षापर्यंत असेल.

९) पक्ष क्र. २ ला आपला परवाना इतर व्यक्तींकडे हस्तांतरीत करावयाचा असल्यास त्याकरिता पक्ष क्र. १ ची पुर्व परवानगी आवश्यक राहील. सदर परवानगी खालील प्रमाणे शुल्क आकारून दिली जाईल.

अ. परवाना धारकांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे पत्नी, मुलगा, अविवाहीत मुली इत्यादीकडे परवाना हस्तांतरीत करावयाचा असल्यास रू. १०,०००/- (दहा हजार रूपये) पक्ष क्र. १ कडे जमा करून हस्तांतरणाची कार्यवाही करता येईल. परंतु कराराच्या कालावधीत परवाना धारकाचा मृत्यू झाल्यास यांच्या वर उल्लेखीत वारसाकडे कुठल्याही हस्तांतरीत शुल्काशिवाय परवाना हस्तांतरीत करता येईल.

ब. परवाना धारकाच्या कुटुंबातील व्यक्ती, पत्नी, मुले, इत्यादी सोडून इतर व्यक्तीकडे परवाना हस्तांतरण शुल्क पक्ष क्र. १ कडे जमा करून, तशी परवानगी घेणे पक्ष क्र. २ वर बंधनकारक राहील.

१०) सदरील व्यापारी संकुलातील गाळ्यांचा परवाना मिळतेवेळी त्यासाठी आवश्यक ते शुल्क जसे स्टॅम्प पेपर्स, टंकलेखन, नोंदणी शुल्क इत्यादी

Scanned with CamScanner

वहन करण्याची संपूर्ण जवाबदारी पक्ष क्र. २ वर राहील.

११) सदरील व्यापारी संकुलातील सर्व परवाना धारकांनी इमारतीच्या देखरेखीसाठी एक नांदणीकृत देखरेख समिती स्थापुन इमारतीच्या निगरानी करीता चौकीदाराची नेमणूक करून इमारतीचे साफसफाई, दिवाबत्ती, दुरूस्ती पाणी व्यवस्था इत्यादी करीता विकासकाने प्रत्येक परवाना धारकाकडून रू. १०,०००/- (दहा हजार रू. फक्त) किंवा रू. ५०/- चौरस फुटाप्रमाणे गाळ्याच्या क्षेत्रफळाइतके शुल्क परवाना धारकाकडून आकारून ते राष्ट्रीयकृत बँकेत देखरेख समितीच्या नावे कायम अग्रीम धन ठेऊन त्यावर मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून इमारतीचा देखरेख खर्च चालवावा. त्यापेक्षा जास्त रकमेची आवश्यकता भासल्यास सर्व परवाना धारकाकडून सारख्या प्रमाणात रक्कम परवाना धारकाकडून जमा करावी.

१२) पक्ष क्र. २ ला आपल्या गाळ्याचा वापर मद्य विक्री किंवा इतर गैरकायदेशीर कामाकरिता करता येणार नाही.

१३) पक्ष क्र. २ ला आपल्या गाळ्याचा आकार बदलता येणार नाही. तसेच आपली हद्द वाढविता येणार नाही. तसेच बोर्डाची जागा बदलता येणार नाही.

१४) व्यापारी संकुलातील संपुर्ण इमारत त्यातील इतर साहित्य जसे इलेक्ट्रीक कनेक्शन व फीटींग, हातपंप, नळ कनेक्शन इत्यादी पक्ष क्र. १ च्या मालकीचे असुन पक्ष क्र. २ ला त्यातील गाळा केवळ परवान्याच्या कालावधी पर्यंत वापरता येईल.

१५) व्यापारी संकुलाच्या संपूर्ण जमिनीचा आणि त्यावरील इमल्याचा तावा हा नेहमी करीता पक्ष क्र. १ चा राहील.

१६) पक्ष क्र. १ ला कोणताही फलक व्यापारी संकुलाच्या संपुर्ण इमारतीत व इमारतीवर लावण्याचा अधिकार असेल. परंतु पक्ष क्र. २ ला मात्र व्यापारी संकुलात इतरत्र कोणत्याही महापालिकेच्या (पक्ष क्र. १ च्या) परवानगी शिवाय फलक लावता येणार नाही.

१७) पक्ष क्र. २ ने आपल्या मंजुर झालेल्या गाळ्याकरिता स्वतंत्र विज कनेक्शन घेऊन स्वतंत्र मिटर घ्यावे. आणि आपले विजेचे देयक स्वतः अदा करावे.

१८) पक्ष क्र. २ ला व्यापारी संकुलाच्या गच्चीवर कोणत्याही प्रकारे अधिकार असणार नाही. परंतु पक्ष क्र. १ ला मात्र त्या गच्चीवर अधिकार असुन त्यावर बांधकाम करण्याचा अधिकार राहील.

१९) परवाना शुल्काची रक्कम ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी करिता थकीत झाल्यास सदर परवाना रद्द करण्याचा अधिकार पक्ष क्र. १ ला असेल.

सदरील कराराच्या अटीनुसार पक्ष क्र. १ आणि पक्ष क्र. २ आज दिनांक 28/6/2006 रोजी अकोला येथे कराराच्या अटी समजुन घेऊन मान्य झाल्याने साक्षीदार समक्ष स्वसंमतीने स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक : 28/6/06 पक्ष क्र. १ ........

उप आयुक्त

साक्षीदार महानगरपालिका, अकोला.

१) ........

पक्ष क्र. २ ........

२) ........

( )

(6)

मा.आयुक्त
महानगरपालिका, अकोला.

अर्जदार :- मुझफ्फर अहेमद शे. छोटु कुरेशी रा. कादरी पुरा अकोला.

विषय :- आवंटन पत्र मिळणे बाबत.

महोदय,

मी विनंती पुर्वक अर्ज करतो की, मला कादरीपुरा येथील नझुल शिट क्र. ३४ डी, प्लॉट नं. ४२ येथील मनपाचे व्यापारी संकुल मधिल गाळा क्र. १९ मनपाचे कंत्राट विकासक सै.जहुर सै.रियाज यांचे कडुन मिळाले आहे. सोबत त्यांचे तसे पत्र जोडले आहे.

तरी मला करारनामा करुन आवंटन पत्र देण्याची कृपा करावी. ही विनंती. मी मनपाचे नियमानुसार दुकानाचे कर भरण्यास तयार आहे.

दि. १९/२/०६

आपला नम्र

मुझफ्फर अहेमद

(मुझफ्फर अहेमद शे. छोटु कुरुशी)

प्राप्त
[signature]
२०/२/०६

(५)

(अलॉटमेंट लेटर)

जा.क्र./अमनपा/बाजार/296/07
अकोला महानगरपालिका, अकोला.
दिनांक 25/6/08

# आदेश

अकोला महानगरपालिका हद्दीतील कादरिया पौता बुध्द मार्ग, अशोक नगर परिसरातील प्लॉट क्र. के ४२ शिट क्र.३४ डी. अकोला येथील जागेत व्यापारी संकुल उभारण्याचे करार तत्कालीन न. प. ने विकासक श्री. से. जहुर से. रियाज रा. अशोक नगर, अकोला या विकासकाकडे दिले होते. त्या संदर्भात नगर परिषदेने सदरील व्यापारी संकुल उभारणे कामी विकासक श्री. से. जहुर से. रियाज आणि तत्कालीन नगर परिषद अकोला यांच्यात झालेल्या दिनांक :-१५/६/२००१ च्या करारानुसार शिफारस केलेल्या व्यापाऱ्यांना न. प. ने आवश्यक परवाना शुल्क आकारून निश्चित अटी व शर्तीवर सदरील दुकाने निश्चित कालावधीकरिता वापरण्यास द्यावयाचे ठरले आहे.

विकासक श्री. से. जहुर से. रियाज यांनी केलेल्या शिफारशीनुसार करारनाम्यातील पार्ट क्र. २ श्री. मुजफ्फर अहमद शेख कुरेशी रा. अकोला यांना सोबत जोडलेल्या करारनाम्यातील शर्ती व अटीवर सदरील व्यापारी संकुलामधील दुकान क्र. 19 दि. 25/6/02 पासून ३० वर्षांपर्यंत परवाना मंजुर करण्यात येत आहे.

मा. आयुक्त यांचे मान्यतेने.

उपायुक्त (प्र.)
अकोला महानगरपालिका, अकोला

प्रतिलिपी :
श्री. मुजफ्फर अहमद शेख कुरेशी
8558

२ प्रति

30-6-2007

(६)

मा. आयुक्त
महानगरपालिका, अकोला

विषय :- मुजफ्फर हुसैन शे. छोटु कुरेशी यांना कादरीपुरा येथील दुकान क्र. १९ देणे
बाबत.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, कादरी पुरा येथील दुकान क्र. १९ नामे मुजफ्फर हुसैन शे. छोटु कुरेशी यांना दिलेली आहे. करिता आपल्या माहितीस्तव सादर.

दि. २९/८/०६

आपला

Sd/-

(सै. जहुर सै. रियाज)
ठेकेदार बि.ओ.टी

Scanned with CamScanner